.

**ठळक बातम्या**

- महिला आरक्षणाबाबतचं घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत नामंजूर, इतर दोन विधेयकही सरकारकडून मागे

- विरोधकांनी ऐतिहासिक संधी गमावल्याची सरकारची टीका

- दुहेरी नागरिकत्व प्रकरणी राहुल गांधी यांच्या विरोधात एफआयआर नोंदवण्याचे अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ पीठाचे निर्देश

**आणि**

- लेबनॉन आणि इस्त्रायल यांच्यातल्या शस्त्रसंधीच्या कालावधीत होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी खुली करण्याची इराणची घोषणा

**<><><><><>**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत २०२९ पासून महिला आरक्षण लागू करण्यासाठी आवश्यक असलेलं घटनादुरुस्ती विधेयक आज लोकसभेत मंजूर झालं नाही. लोकसभेत कालपासून १३१ वं घटना दुरुस्ती विधेयक, पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश दुरुस्ती विधेयकावर चर्चा सुरू होती. त्यावर थोड्याचवेळापूर्वी झालेल्या मतदानात उपस्थित असलेल्या ५२८ पैकी २९८ खासदारांनी १३१ व्या घटना दुरुस्ती विधेयकाच्या बाजूनं, तर २३० खासदारांनी विरोधात मतदान केलं, असं लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनी जाहीर केलं.

**होल्ड बाईट-ओम बिर्ला**

हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं त्यासाठी २ तृतीयांश खासदारांची मंजुरी आवश्यक होती. ५२८ पैकी दोन तृतीयांश म्हणजेच ३५२ खासदारांनी या विधेयकाच्या बाजूनं मतदान केलं नसल्यानं हे विधेयक नामंजूर झालं. त्यामुळं इतर

दोन विधेयक मागे घेत असल्याचं संसदीय कार्यमंत्री किरेन रीजीजू यांनी जाहीर केलं.

**होल्ड बाईट-किरेन रीजीजू**

**<><><><>**

महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना देश माफ करणार नाही असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या विधेयकावरच्या चर्चेदरम्यान केलं. या विधेयकाला विरोध करणारे ओबीसी, दलितांच्या विरोधातले असल्याचा दावा त्यांनी केलं. हे विधेयक लागू करण्यासाठी सरकारनं सर्व लोकसभा आणि विधानसभेतल्या जागांची संख्या ५० टक्क्यांनी वाढवेल, असं आश्वासन त्यांनी यावरच्या चर्चेदरम्यान दिलं होतं. २०२९ पासून महिला आरक्षण लागू करायचं असेल तर आता हे विधेयक मंजूर होण्याची गरज त्यांनी व्यक्त केली होती. मंत्रीमंडळानं मान्यता दिल्यानुसार चालू जनगणनेत जातनिहाय गणना होणार असल्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. उत्तर आणि दक्षिणेतल्या राज्यांमध्ये भेदभाव करण्याचा सरकारचा कोणाताही विचार नसल्याचं ते म्हणाले

**होल्ड अमित शहा बाइट**

**<><><><>**

लोकसभेत आजही महिला आरक्षणाच्या संदर्भातलं १३१ वं संविधान दुरुस्ती विधेयक, पुनर्रचना विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश दुरुस्ती विधेयकावर चर्चा झाली. याविषयी अधिक तपशील जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून...

**होल्ड व्हाइस कास्ट**

*(देशातल्या कोट्यवधी महिलांच्या इच्छा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हे विधेयक सादर केलं असल्याचं केंद्रीय महिला आणि बाल कल्याण मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या. निर्णय प्रक्रियेत महिलांना योग्य स्थान देण्यासाठी हे विधेयक आणलं आहे. सरकारनं सादर केलेल्या नारी शक्ती वंदन अधिनियमाचा महिला सक्षमीकरणाशी काहीही संबंध नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला. देशातल्या निवडणुकांचं गणित याद्वारे बदलण्याचा घाट*

*सरकारनं घातला आहे. यामुळं दलित आणि ओबीसींचे हक्क डावलले जातील, असं राहुल गांधी म्हणाले. यावेळी राहुल गांधी यांच्या वक्तव्यातल्या काही शब्दांवर सभापती ओम बिर्ला यांनी आक्षेप घेतला आणि संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांनी राहुल गांधींनी प्रधानमंत्र्यांची माफी मागावी अशी मागणी केली. सर्व महिलांचा त्याग, कष्ट आणि धैर्याला सलाम म्हणून हे विधेयक आणलं जात असल्याचं भाजपाच्या हेमा मालिनी म्हणाल्या. देशातली संघराज्य व्यवस्था विस्कळीत करण्यासाठी हे विधेयक आणल्याचा आरोप द्रमुकच्या के कनिमोळी म्हणाल्या. काँग्रेसच्या शशी थरूर यांनी यावर विस्तारानं चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली. तृणमूल काँग्रेसच्या कल्याण बॅनर्जी यांनी सर्व महत्त्वाच्या पदांवर महिलांसाठी ५० टक्के आरक्षण ठेवण्याची मागणी केली. )*

**<><><><><>**

१०६ वी घटना दुरुस्ती अधिनियम २०२३ म्हणजेच 'नारी शक्ती वंदन अधिनियम' आजपासून लागू झाल्याची अधिसूचना जारी झाली आहे. २०२३ मध्ये संसदेने हा कायदा संमत केला. या कायद्यामुळे लोकसभा आणि दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्राच्या विधानसभांसह सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी एक-तृतीयांश जागा फिरत्या पद्धतीने राखीव ठेवण्याची तरतूद या कायद्यात आहे.

**<><><><><>**

राज्यसभेचे उपाध्यक्ष म्हणून हरिवंश नारायण सिंग यांची बिनविरोध निवड झाली. केंद्रीय मंत्री आणि सभागृह नेते जगत प्रकाश नड्डा यांनी हरिवंश यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. भाजपा खासदार एस फँगनॉन कोन्याक यांनी अनुमोदन दिलं. ९ एप्रिल रोजी हरिवंश यांचा कार्यकाळ संपल्यानंतर हे पद रिक्त झालं होतं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी हरिवंश यांचं अभिनंदन केलं. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे आणि इतर पक्षांच्या गटनेत्यांनीही हरिवंश यांचं अभिनंदन केलं.

**<><><><><>**

रायबरेलीचे खासदार आणि लोकसभेचे विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात दुहेरी नागरिकत्व प्रकरणी एफआयआर नोंदवण्याचे निर्देश अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ पीठानं आज दिले. राहुल गांधी यांच्यावरच्या आरोपांची तपासणी होण्याची गरज असून, या प्रकरणाचा तपास उत्तर प्रदेश सरकारनं स्वत: करावा, किंवा केंद्रीय यंत्रणांकडे सोपवावा, असे निर्देशही न्यायमूर्ती सुभाष विद्यार्थी यांनी दिले.

ही याचिका भाजपा कार्यकर्ते ए. विघ्नेश शिशिर यांनी दाखल केली होती. लखनौच्या विशेष एमपीएमलए न्यायालयाच्या २८ जानेवारीच्या आदेशाला त्यांनी आव्हान दिलं होतं.

<><><><><>

होर्मुझची सामुद्रधुनी सर्व व्यापारी जहाजांसाठी 'पूर्णपणे खुली' करण्याची घोषणा आज इराणने केली. लेबनॉन आणि इस्त्रायल यांच्यात १० दिवसांच्या शस्त्रसंधीची घोषणा केल्यानंतर शस्त्रसंधीच्या उर्वरीत कालावधीसाठी हा मार्ग खुला राहील,असं इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सांगितलं. मात्र सर्व जहाजांनी इराणच्या बंदरे आणि सागरी संघटनेने 'आधीच जाहीर केलेल्या समन्वित मार्गावरूनच' प्रवास केला पाहिजे, असंही ते म्हणाले. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या या निर्णयाचं स्वागत केलं आहे.

<><><><><>

इस्त्राएल आणि लेबनॉन यांच्यात शस्त्रसंधी झाल्याचं भारत स्वागत केलं आहे. परराष्ट्रव्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता रणधीर जयस्वाल यांनी नवी दिल्लीत आयोजित पत्रकारपरिषदेत सांगितलं, की शांततेच्या दिशेनं टाकलेल्या प्रत्येक पावलाचं भारत स्वागत करतो.

<><><><><>

आयपीएल मध्ये आज अहमदाबाद इथल्या नरेंद्र मोदी स्टेडीअममध्ये गुजरात टायटन्स आणि कोलकता नाईट रायडर्स यांच्यात सामना सुरु आहे. कोलकता नाईट रायडर्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा कोलकता नाईट रायडर्सच्या ८ षटकात ३ बाद ५९ धावा झाल्या होत्या.

<><><><><>

मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्समधे आज ५२६ अंकांची वाढ झाली आणि तो ७८ हजार ५१५ वर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी १६५ अंकांच्या सुधारणेसह २४ हजार ३६२ अंकांवर बंद झाला.

//<><><><><>//